सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००४२६१**

**अपिलार्थी श्री. शकिल मोहम्मद मौलवी**

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी**

भवन्स कॉलेज, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

**प्रथम अपिलीय अधिकारी**

भवन्स कॉलेज, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२१**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : व्ही. सी.द्वारे उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : व्ही. सी.द्वारे उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०४.२०१९ | - | ३०.०५.२०१९ | १५.०७.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १७.१०.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २४.०४.२०१९ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे.

" Undertaking Submitted By Bhavan's College Teachers to The Jt. Dir. & Dy. Dir. If Edn. W. R.T. Association With Coaching Classes, W.P. 1035 of 1998 (Encl. 1,2,3,4,5)
From 1998 on wards till date

i) Inspection of Files pertaining to the undertaking given by a) Late Prof. C. N. Sharma b) Prof. D. V. Dagli c) Prof. Rajeev Pandit d) Prof. Priti Iyar e) Prof.Shakeel Moulvi f) Prof. Ram Iyar & g) Prof. Dilip Rajapurkar, to Jt Dir./Dy. Dir. Of Edn.

ii) Allow to take photo copies of required documents after inspection of file containing documents pertaining to undertaking of the above mentioned teachers.

iii) Allow photography and videography during inspection of documents and files.

माहिती मिळालेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर कोणतीही सुनावणी न घेता थेट उत्तर पाठविण्यात आले आहे असे नमूद करुन द्वितीय अपील अर्ज सादर करण्यात आला आहे.

..२/-

अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००४२६१

..२..

अपिलार्थी यांना त्याच्या द्वितीय अपील अर्जासोबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे पत्र दिनांक [illegible] संलग्न केले आहे. सदर पत्रान्वये अपिलार्थी यांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे:

Application dated 24.04.2019 and appeal dated 30.05.2019 regarding the Undertaking Submitted By Bhavan's College Teachers to The Jt. Dir. & Dy. Dir. If Edn. W. R. T. Association with Coaching Classes this is to inform you that the information is pertaining to the Office of JT Dir. & Dy. Dir. O Edn. And also the information sought is a 'third party information which do not have larger public interest. Hence your appeal stands rejected under the Sec. 8(1)(j) of the RTI Act, 2005."

अपिलार्थी यांनी विभिन्न प्राध्यापकांचे द्वारा सादर करण्यात आलेल्या हमीपत्राची मागणी केली आहे. हमीपत्राच्या संबंधित कागदपत्रांच्या मागणीचे कारण विचारल्यावर त्यांनी असे सादर केले की, त्यांना victimise करण्यात आले आहे. त्यांना पगार मिळालेला नाही व त्यांचेकडून हमीपत्र घेण्यात आले आहे. म्हणून त्यांना असे सिध्द करायचे आहे की ते victimise झाले आहेत. या कारणामुळे त्यांना माहिती हवी आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सादर केले की, हमीपत्र सह संचालक व उप संचालक यांना सादर करण्यात आले आहे. त्याची प्रत त्यांचेकडे उपलब्ध नाही व विचारलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असून नाकारण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जाला उत्तर दिले नाही व प्रथम अपीलावर सुनावणी न घेता थेट उत्तर देण्यात आले आहे ही कृति बरोबर नाही. या प्रकरणी विभिन्न प्राध्यापकांनी सादर केलेल्या हमीपत्राची (undertaking) मागणी करण्यात आली आहे. माहिती त्रयस्थ पक्षाची आहे.

सुनावणीच्या वेळी विचारल्यावर अपिलार्थी यांनी असे सादर केले की, ज्या प्राध्यापकांसंबंधी त्यांनी माहिती विचारली आहे ते कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण देत आहेत व याबाबत त्यांनी कारला शुक्ला क्लासेस यांचे ब्रोशर आयोगासमोर सादर केले व इतर क्लासेस संबंधी संबंधीत प्राध्यापक त्या ठिकाणी शिक्षण देत आहेत या संबंधीचे कागदपत्र सादर केले आहे व असे नमूद केले की धोरणाप्रमाणे कोचिंग क्लासमध्ये शिक्षण देण्या इत्यादीला परवानगी नाही. तथापि हे प्रोफेसर त्या ठिकाणी शिक्षण देत आहेत. याबाबत त्यांनी तक्रारही केली होती. तथापि, तक्रारीवर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. असे नमूद करुन अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित Prof guidelines च्या विरोधात Coaching Classes मध्ये Coaching देत आहेत व त्यांनी चुकीचे हमीपत्र दिलेले आहे. या कारणामुळे माहिती सार्वजनिक होणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केले आहे की, हमीपत्र Jt Div/Dy.Dir. कडे सादर करण्यात आले आहेत. अशा स्थितीत माहितीचा अर्ज कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत करणे आवश्यक होते. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

अपिलार्थी यांनी माहिती सार्वजनिक करणेबाबत जो युक्तिवाद केला आहे तो लक्षात घेता व ज्या अर्थी विचारलेली माहिती त्रयस्थ पक्षासंबंधी आहे या कारणामुळे कोणतेही आदेश पारीत करणे अगोदर संबंधित त्रयस्थ पक्षांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे. या कारणामुळे कलम १९(४) च्या तरतूदीचा वापर करुन संबंधित त्रयस्थ पक्षाला त्यांचे म्हणणे सादर करणेसाठी या प्रकरणावर पुढील सुनावणी दिनांक ३०.०८.२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल. कार्यालयाने संबंधित त्रयस्थ पक्षाला नोटीस पाठवावी.

**मुंबई**
**दिनांक : ०८.०७.२०२१**

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

State Informati
Greate

## अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००४२६१

## अपिलार्थी श्री. शकिल मोहम्मद मौलवी

## सुनावणी दिनांक :- ३०.०८.२०२१ (In continuation of order dt ०८.०७.२०२१)

सदर प्रकरणात आयोगाने दि. ०१.०७.२०२१ रोजी सुनावणी घेवून दि.०८.०७.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित केले होते :-

"अपिलार्थी यांनी माहिती सार्वजनिक करणेबाबत जो युक्तीवाद केला आहे तो लक्षात घेता व ज्या अर्थी विचारलेली माहिती त्रयस्थ पक्षासंबंधी आहे या कारणामुळे कोणतेही आदेश पारित करणे अगोदर संबंधित त्रयस्थ पक्षांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी संधी देणे आवश्यक आहे. या कारणामुळे कलम १९ (४) च्या तरतुदीचा वापर करुन संबंधित त्रयस्थ पक्षाला त्यांचे म्हणणे सादर करणेसाठी या प्रकरणावर पुढील सुनावणी दि.३०.०८.२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल."

२. त्याप्रमाणे सदर प्रकरणात आज दि. ३०.०८.२०२१ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे तिन्ही पक्षकार व्हि.सी.द्वारे उपस्थित आहेत. तसेच सात त्रयस्थ पक्षकारांपैकी प्रा. प्रिती अय्यर व प्रा.राम अय्यर हे दोन त्रयस्थ पक्षकार व्ही.सी.द्वारे उपस्थित आहेत. तर, प्रा.सी.एन.शर्मा, प्रा. डी.व्हि.डगली, प्रा.राजीव पंडीत, प्रा.शकील मौलवी व प्रा. दिलीप राजपूरकर हे पाच त्रयस्थ पक्षकार अनुपस्थित आहेत.

सुनावणीवेळी उपस्थित दोन्ही त्रयस्थ पक्षकारांनी (प्रा. प्रिती अय्यर व प्रा.राम अय्यर) असे स्पष्ट केले की, त्यांच्याशी संबंधित हमीपत्राची माहिती देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही. तर, उर्वरित पाच त्रयस्थ पक्षकार अनुपस्थित असल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. तसेच त्यांनी कोणतेही लेखी म्हणणे सादर केलेले नाही.

३. या अपिलासंदर्भातील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर व उपस्थितांचे युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दि. २४.०४.२०१९ च्या माहिती अर्जान्वये, Undertaking submitted by Bhavan' s College Teachers to the Jt. Dir & Dy Dir. of Edn. W.R.T. association with coaching classes, W.P.1035 of 1998 (encl. 1,2,3,4,5) from 1998 onwards till date. **(i)** Inspection of files pertaining to the undertaking given by a) Late Prof. C.N.Sharma b) Prof. D.V.Dagli, c)Prof. Rajeev pandit d) Prof. Priti iyar e) prof. shakeel Moulvi f) prof. Ram Iyar & g) prof. Dilip Rajapurkar to jt Dir / Dy Dir.of Edn. **(ii)** Allow to take photocopies of required document after inspection of file containing documents pertaining to undertaking of the above mentioned Teachers बाबत माहितीची मागणी केली होती.

त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतेही उत्तर / प्रतिसाद दिलेला नाही. परंतु, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०५.२०१९ च्या प्रथम अपीलास अनुसरुन दि.१५.०७.२०१९ च्या पत्रान्वये अपिलार्थींनी मागितलेली माहिती वैयक्तिक माहिती असून त्यात कोणतेही व्यापक जनहित नाही तसेच मागितलेली माहिती सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे, असे नमूद करुन कलम ८ (१) (J) अन्वये माहिती देण्यास नकार दर्शविला आहे.

तसेच, त्यांनी याच पत्रात असेही नमूद केले आहे की, भवन्स कॉलेजमधील जन माहिती अधिकारी हे नियतवयोमानानुसार निवृत्त झालेले असल्याने व महाविद्यालयीन प्रवेश प्रकिया सुरु असल्याने माहिती अर्जास उत्तर देण्यास विलंब झाला आहे.

मात्र, अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपीलाच्या कारणात असे स्पष्ट नमूद केले आहे की,

**7.1:-** ............The PIO failed to provide or refused the information sought while the present appellant having visited the PIO office in person to collect the desired information and a protest letter was submitted to the PIO.

**7.2 :-** The Appellate Authority has provided 'One Common reply dated 15.07.2019............

**7.5 :–** The demanded documents are public documents not pertaining to the security of the country as the documents are as a result of W.P.No.1035 of 1998 filed in Mumbai High Court.

..2/-

यावरुन असे स्पष्ट होते की, माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने उत्तर दिले आहे अशी वस्तुस्थिती नसून प्रत्यक्षात कोणतेही उत्तर / प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे.

या प्रकरणात अपिलार्थी यांनी भवन्स कॉलेज, अंधेरी, मुंबई येथील सात प्राध्यापकांनी सादर केलेल्या हमीपत्राशी संबंधित कागदपत्रांचे निरीक्षण व निरीक्षणानंतर हमीपत्राच्या प्रतींची मागणी केली आहे.

सदर माहिती मागणीच्या समर्थनार्थ त्यांनी अपीलासह सादर केलेल्या सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांनी प्राचार्य, भवन्स कॉलेज, अंधेरी, मुंबई यांना लिहिलेल्या दि.१४.०९.१९९८ च्या "शिकवणी वर्ग (कोचिंग क्लास) याचिका क्र.१०३५/१९९८" या विषयावरील पत्रात असे नमूद केले आहे की, ही याचिका सादर करतांना "Forum for fairness in education" या संस्थेने शिकवणी वर्ग चालविणारे व शिकवणी घेणाऱ्या शिक्षकांची यादी मा. न्यायालयात सादर केली होती. त्या यादीमध्ये आपल्या महाविद्यालयातील पुढील शिक्षकांची नावे आहेत :- १) प्रा. सी.एस.शर्मा (उपप्राचार्य), २) प्रा. शकील मौलवी, ३) प्रा. राम अय्यर, ४) प्रा. प्रिती अय्यर, ५) प्रा. राजिव पंडीत.

तसेच, Forum for Fairness in Education या संघटनेने दि. ११.१०.१९९९ रोजी सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांना लिहिलेल्या पत्रासोबत सादर केलेल्या कालरा-शुक्ला क्लासेसच्या माहितीपत्रकातील माहितीनुसार भवन्स कॉलेजमधील काही प्राध्यापक खाजगी कोचिंगमध्ये सहभागी असल्याचे दर्शविले आहे.

वरील विवेचनावरुन आयोग या निष्कर्षाप्रत येते की, संबंधित प्राध्यापकांनी महाविद्यालयीन सेवेत कार्यरत असतांना ते खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये सहभागी आहेत किंवा नाहीत, यानुषंगाने महाविद्यालयामार्फत सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांना हमीपत्र सादर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून, अपिलार्थीस सदर हमीपत्रांच्या प्रती अपेक्षित आहेत.

सदर हमीपत्र सादर करणारे प्राध्यापक हे शासन सेवेतील कर्मचारी असल्याने त्यांनी सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या निर्देशानुसार त्यांची हमीपत्रे महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत सहसंचालकांना सादर केली असल्याचेही स्पष्ट होते. म्हणजेच, सदर हमीपत्राची एक प्रत (O.C.) महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. तसेच, सदर हमीपत्रे शासकीय कर्मचाऱ्यांनी शासनास सादर केलेले असल्याने ती कागदपत्रे / माहिती महाविद्यालयाच्या कार्यालयीन अभिलेखावरील माहिती ठरते म्हणून ती कर्मचाऱ्याची वैयक्तीक आहे असे म्हणता येणार नाही. याउलट सदर माहिती (हमीपत्रे) माहितीचा अधिकार अधिनियमाच्या पारदर्शकतेच्या प्रमुख उद्दीष्टानुसार प्रकट करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उचित ठरणारी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ व ९ मधील तरतुदीं व्यतिरिक्त कोणतीही माहिती नाकारता येत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारण्यासाठी कलम ८ (१) (J) चा घेतलेला आधार योग्य ठरत नाही. सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, अपिलार्थींनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या हमीपत्रांच्या प्रतींची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत अपिलार्थींना निशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात. सदर माहिती पुरविल्याची खात्री प्रथम अपिलीय अधिकारी यांनी करावी.**

२. **जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७ (१) अन्वये ३० दिवसात माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन महिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यास्तव त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा हा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यामार्फत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

३. **यासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०३.०२.२०२२**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**